# गजानन कीर्तिकर

खासदार (लोकसभा)
नेते–शिवसेना
27, मुंबई उत्तर–पश्चिम लोकसभा
सदस्य
लोकलेखा समिती
रेल्वे स्थायी समिती

सत्यमेव जयते

10, श्रेयस कॉलनी, आरे मार्ग,
गोरेगांव (पूर्व), मुंबई–400063
दूरध्वनी : 022-29270262, 29270362
ई–मेल : gajanan.kirtikar@yahoo.com
वेबसाईट : www.gajanankirtikar.com
दिल्ली :
बी–७०२, एम.एस. फ्लॅटस्, बी.के.एस्. मार्ग
नवी दिल्ली–110 001
दूरध्वनी : 011-23326556


दिनांक :-१०/१२/२०१४

**<u>कृपया प्रसिध्दीसाठी</u>**

स.न.वि.वि.,

आज बुधवार दिनांक १० डिसेंबर रोजी लोकसभेत पुरवणी मागण्यांच्या चर्चेच्या वेळेस खासदार श्री.गजानन कीर्तिकर यांनी महाराष्ट्रातील विविध योजनांसाठी पुरवणी मागण्यांची मागणी केली. त्याबाबतचे खालील वृत्तनिवेदन कृपया अवश्य प्रसिध्द करावे, ही विनंती.

आपला नम्र ,

( प्रसाद जोशी )
स्विय सहाय्यक
मो.-९५९४९७७९८२

---

नवी दिल्ली, ता. १० : मुंबईतील पर्जन्य जलवाहीन्या १०० वर्षे जुन्या झाल्या असल्यामुळे नवीन टाकण्यासाठी रु.२६८४ कोटी, जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्वसन योजने अंतर्गत महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागासाठी अतिरिक्त १५०० कोटी, मुंबईतील समुद्र किनारे पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत करण्यासाठी २०० कोटी, इंडिया हैबीटेट सेन्टर व प्रगती मैदान, दिल्ली याच्या धर्तीवर मुंबई मध्ये संकुल उभारण्यासाठी ५०० कोटी रूपये, महाराष्ट्रातील वाढत्या नक्षलवादी व अतिरेक्यांच्या कारवाया रोखण्यासाठी पोलीस दलाचे सक्षमीकरण-आधुनिकीकरण करण्यासाठी केन्द्र शासनाकडून रूपये ७१.८० कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे. तो तुटपुंजा असून केन्द्राने किमान ३०० कोटी द्यावे. नक्षलग्रस्त भागात आधुनिक व नवीन पोलीस ठाण्यासाठी रू. २०० कोटी, वन अधिनियम कायदा १९८८ नुसार राज्यात ३३ टक्के वन क्षेत्र राखीव असणे बंधनकारक आहे. महाराष्ट्रात फक्त १९ टक्के वन क्षेत्र आहे. त्याची वाढ करण्यासाठी राष्ट्रीय वनीकरण योजने अंतर्गत रू. १७.५० कोटी दिलेला निधी अपुरा आहे, किमान १०० कोटी करण्यात यावा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अगबी समुद्रातील स्मारकासाठी २ हजार कोटी रुपये, राष्ट्रीय वन उद्यानातील बाधीत गावांच्या पुनर्वसनासाठी रू. २१७.४९ कोटी, महाराष्ट्रातील कापूस खरेदीसाठी नाफेडची कर्ज मर्यादा वाढविणे गरजेचे आहे. जवाहरलाल नेहरु शहर विकास योजने अंतर्गत ३२ हजार ५४ घरांची कामे निधी विना प्रलंबीत आहेत, त्याकरिता ४ हजार ३९५ कोटी रुपये, महाराष्ट्रातील १२ हजार ६५० किमीचे रस्ते अत्यंत दुरावस्थेत आहेत. पंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना दुसरा हप्ता अद्याप मिळालेला नाही, तो तात्काळ देण्यात यावा. महाराष्ट्राला ७२० किमीचा समुद्र किनारा लाभला असून बहुतांश ठिकाणी मॅंग्रोव्ह वनस्पती आहेत, त्यांचे रक्षण व वृध्दीसाठी १० कोटी रुपये, नॅशनल डिजास्टर रिस्पॉन्स फंड ९२१.९८ कोटी मंजूर झाला आहे.परंतु केन्द्रीय समितीने पाहणी करुन हा फंड किमान १ हजार ४४३ कोटी ३२ लाख द्यावा अशी शिफारस केली आहे,त्याची पुर्तता करावी. राजीव गांधी खेल अभियान व्दारा महाराष्ट्र राज्याला क्रीडा सुविधेच्या आधुनिकीकरणासाठी जास्त निधी देण्यात यावा. केन्द्र पुरस्कृत अस्कड योजनेअंतर्गत किमान ५०० कोटी रुपयांचा निधी, मुंबई शहरातील वर्सोवा, मढ या बोटींच्या धक्क्यांच्या नुतनीकरणासाठी किमान १ हजार कोटी रुपये फिडर सेपरेशन योजनेसाठी ८ हजार ५०० कोटी रु., शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कॅन्सर हॉस्पिटल, औरंगाबाद व नागपूर मध्ये कॅन्सर इन्स्टिटयूटच्या निर्मितीसाठी २०० कोटी रू., मागासगवर्गीय विद्यार्थ्यांना १ हजार ३९२ कोटी रू. शिष्यवृत्ती दिली जाते त्यात वाढ करण्यात यावी. युआयजी व युआयडीएसएसएमटी योजने अंतर्गत महाराष्ट्राला केवळ ३ हजार ६९६ कोटी ४६ लाख निधी मंजूर झाला आहे. किमान ५४ हजार ७८५ कोटी निधीची आवश्यकता आहे. सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत महाराष्ट्राला १४ हजार ४८८ कोटी २२ लाख रू. निधी मंजूर केला आहे, परंतु राज्यातील २० हजार ४० टक्के शाळांमध्ये दुरूस्ती करणे गरजेचे आहे.त्याकरिता किमान २०हजार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन द्यावा,अशी मागणी खा.गजानन कीर्तिकर यांनी केली.

———————